महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, जि. रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड, अलिबाग. जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.०२१४१-२९९२१ www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/दरपत्रक/ Lease Line Internet/२३९१/२०२५ दि. १४/०८/२०२५

दरपत्रक मागणी पत्र.

प्रति,

____________________

____________________

____________________

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड येथील आर. सी. एफ कॉलनी कुरुळ येथे आवश्यक असणाऱ्या 100 Mbps Internet Leased Line Connection या सेवे करीता दरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत..

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड कुरुळ या संस्थेमध्ये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, दिल्ली यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयामधील प्रक्षेपण करणेकामी Cisco router साठी 100 Mbps या वेगाची Leased Line असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Particulars | Tenure | Unit Price |
|---|---|---|---|
| 1. | **Dedicated Leased Line (1:1) Speed - 100 Mbps Internet** | Yearly | Including all taxes |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा, दि. २२/०८/२०२५ रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही / ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफयावर प्रशासकीय विभागा करीता दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. लिफाफयावर डाव्या बाजूस दरपत्रक क्र. लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक ग्राह्य कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांका पासुन एका वर्षाकरिता (०१) महिन्यांचा राहील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७. दरपत्रक माहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents) अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ३)जी.एस.टी. क्रमांक पत्र.४) पॅनकार्ड क्रमांक.

८. सदर Internet Leased Line Connection ही सेवा इतर कोणत्या ही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.

९. प्रक्षेपणामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी वेळोवेळी राष्ट्रीय आर्युविज्ञान च्या तंत्रज्ञांची गरजेच्या वेळी सहकार्य करणे अनिर्वाय आहे.

१०. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रक धारकास Internet Leased Line Connection चा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

११. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१२. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत. (With Revenue Stump)

१३. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुक्ल अदा केले जाणार नाही.

१४. पुरवठा धारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, सांकेतांक क्र.(Email address along with Website) हा Envelope वर नमूद असणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविण्या संदर्भात दिनांक :- १४/०८/२०२५ सुचना देण्यात आल्या आहेत.